# स्वच्छता अभियान आज

कोल्हापूर : महात्मा गांधी जयंतीच्या निमित्ताने बुधवारी, (ता. २ ऑक्टोबर) शिवाजी विद्यापीठात स्वच्छता अभियान राबविले जाणार आहे. सकाळी साडेसात ते १० या वेळेत विद्यापीठातील सर्व अधिविभाग, प्रशासकीय विभागांतील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी स्वच्छता करतील.

# जपान - भारत शैक्षणिक आदानप्रदान दृढ करू

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



डॉ. जगन्नाथ पाटील

## डॉ. जगन्नाथ पाटील यांचे प्रतिपादन

जपानमधील शैक्षणिक प्रकल्प, संशोधन यांच्याविषयी कृतीआराखडा तयार करून भारत व जपान यांच्यातील शैक्षणिक आदानप्रदान करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा संकल्प बंगळुरू येथील मूल्यांकन अधिस्वीकृती परिषद तथा नॅकचे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांनी व्यक्त केला. डॉ. पाटील यांची जपान सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मुल्यांकन संस्थेच्या विशेषज्ञ म्हणून निवड झाल्यानंतर कोल्हापुरात पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठ, टिटवे येथील वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय व कोल्हापूर प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने या वार्तालापाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना डॉ. पाटील म्हणाले, 'शिक्षणाच्या बाबतीत जपानचा आपल्या देशावर असलेला प्रभाव हितकारक आहे. नॅकसारख्या धोरण निर्मितीच्या क्षेत्रातील कामाच्या अनुभवातून शिक्षणातील नव्या प्रवाहांकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टिकोन आला असून याचा फायदा जपानमधील शिक्षणव्यवस्था व भारतीय शिक्षणव्यवस्थेतील अपेक्षित गोष्टी यांची सांगड घालण्यासाठी काम करण्याची संधी या निमित्ताने मिळाली आहे. जपानमधील मजबूत मूल्यव्यवस्था ही तेथील प्रत्येकामध्ये शिक्षणातून आली आहे. याउलट भारतात मूल्यापासून भरकटलेली शिक्षण व्यवस्था आहे. त्याचे तोटे आपल्याला पहायला मिळतात. शिक्षणातील बाजारीकरण हा भारतातील दोष आहे. त्यामुळे जपान सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मूल्यांकन संस्थेसाठी काम करत असताना जपानच्या बलस्थानांचा परामर्ष महत्त्वाचा आहे. जपानमध्ये सध्या १८ वर्षांवरील लोकसंख्या कमी आहे. बऱ्याच विद्यापीठांमध्ये विद्यार्थी नाहीत असे चित्र आहे. भारतात युवकांची मोठी संख्या आहे. त्यामुळे भारतातील विद्यार्थ्यांना जपानमधील शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी काही नवे प्रकल्प हाती घेता येतील का यासाठी जपान सरकारकडे प्रस्ताव मांडण्याचाही विचार आहे. जपानमध्ये होणारे शैक्षणिक संशोधन हे जपानी भाषेतच होते. हा चांगला प्रयोग भारततातही करता येईल.' यावेळी प्राचार्य संतोष चौगुले, सुनील पाटील, शिवाजी विद्यापीठाचे पीआरओ अलोक जत्राटकर, प्रेस क्लबचे अध्यक्ष मोहन मेस्त्री उपस्थित होते.

### विविध सन्मानाचे मानकरी

डॉ. जगन्नाथ पाटील यांची जपान सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मुल्यांकन संस्थेचे विशेषज्ञ म्हणून निवड झाली आहे. जपान सरकारने त्यांना निमंत्रित केले आहे. डॉ. जगन्नाथ पाटील कोल्हापूरचे सुपुत्र आणि शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्र विभागातून नेट, सेट आणि पहिले पीएचडीधारक आहेत. जपान सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता मूल्यांकन संस्थेने विशेषज्ञ म्हणून निवड होणारे ते पहिलेच भारतीय आहेत. यापूर्वी त्यांनी अनेक महाविद्यालयांचे समन्वयक व प्रभारी सल्लागार म्हणून कार्य केले आहे. एशिया पॅसिफिक क्वालिटी नेटवर्क असोसिएशनचे (APQN) चौथे आणि पहिले भारतीय अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. इंटरनॅशनल नेटवर्क फॉर क्वालिटी अश्युरन्स एजन्सीज इन हायर एज्युकेशनचे पहिले आशियायी अध्यक्ष म्हणूनही त्यांनी धुरा सांभाळली आहे. ऑस्ट्रेलिया सरकारने त्यांच्या कामाचा 'एन्डेव्हर अवॉर्ड' देऊन सन्मान केला आहे.

# अध्यासनातर्फे कार्यक्रम

कोल्हापूर : विद्यानंद सागर महाराज यांना शिवाजी विद्यापीठाच्या महावीर अध्यासनाच्यावतीने आदरांजली वाहण्यात आली. अध्यासनाच्यावतीने त्यांच्या कार्याविषयी माहिती देण्यासाठी व्याख्यानमालेचे आयोजन केले जाईल अशी माहिती प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

# विद्यापीठात आज स्वच्छता अभियान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी जयंतीच्या निमित्ताने स्वच्छता अभियान राबविले जाणार आहे. विद्यापीठात सकाळी ७.३० ते १० या कालावधीत विद्यापीठातील सर्व अधिविभाग, प्रशासकीय विभाग यामधील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी हे अधिविभागांसह प्रशासनाने नेमून दिलेल्या ठिकाणी स्वच्छता अभियान राबविणार आहेत.

पुढारी

# युवा महोत्सवात 'विवेकानंद'ची बाजी

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या ३९ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये विवेकानंद महाविद्यालयाने सांघिक व वैयक्तिक कलाप्रकारात यश मिळविले. संगीत व नृत्य सर्वसाधारण दोन फिरते चषक पटकावित यशाची परंपरा कायम राखली.

युवा महोत्सवामध्ये नृत्य विभाग- जनरल चॅम्पियनशिप, संगीत विभाग- जनरल चॅम्पियनशिप, सांघिक स्पर्धेतील लघुनाटिका- प्रथम क्रमांक, भारतीय समूहगीत- प्रथम क्रमांक, पाश्चात्त्य समूहगीत स्पर्धा- द्वितीय क्रमांक, लोकनृत्य - द्वितीय क्रमांक, लोक वाद्यवृंद- द्वितीय क्रमांक, मूकनाट्य- तृतीय, पथनाट्य - उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त झाला आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पारितोषिके देऊन यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# भारतीय शिक्षण व्यवस्थेत नीतिमूल्यांची कमतरता : डॉ. जगन्नाथ पाटील

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भारतीय शिक्षण आणि व्यवस्थेत नीतिमूल्यांची कमतरता आढळून येते. मूल्यांची जपणूक होत नसल्याने शिक्षण व्यवस्थेचे बाजारीकरण होत आहे, असे प्रतिपादन नॅकचे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांनी व्यक्त केले. ते कोल्हापूर प्रेस क्लबच्या वार्तालापमध्ये ते बोलत होते. डॉ. जगन्नाथ पाटील यांची जपान सरकारच्या शैक्षणिक गुणवत्ता मूल्यांकन संस्थेने विशेष तज्ज्ञ म्हणून एक वर्षाकरिता निवड केली आहे.

जगन्नाथ पाटील म्हणाले, भारतीय शिक्षण व्यवस्था बाजारीकरणात अडकली असून, त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर होत आहे. मूल्यांमुळे देशप्रेम आणि सार्वजनिक भान तयार होत असते. नीतिमूल्यांचे उत्तम शिक्षण जपानमध्ये दिले जाते. भविष्यात शैक्षणिकदृष्ट्या जपान आणि भारत जोडण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

जपानसारख्या प्रगतिशील देशाने कोल्हापूरसारख्या छोट्याशा शहरातील



व्यक्तीची निवड करणे हे भाग्यशील समजतो. जपानच्या प्रबळ असण्यामागे त्यांची मूल्य व्यवस्था हे प्रमुख कारण आहे. प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत देशप्रेम आणि मूल्यांची उत्तम शिकवण या देशात दिली जाते म्हणूनच जपान आघाडीवर आहे. भारतीय शिक्षण व्यवस्था बाजारीकरणात अडकल्याने नीतिमूल्यांची शिकवण विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यात कमी पडत आहे. केजी ते पीजीपर्यंत शिक्षण हे मातृभाषेत दिले तर भाषेचे महत्त्व वाढेल. संशोधन क्षेत्रातदेखील प्रगती होईल. त्याचा लाभ स्थानिक विद्यार्थ्यांना होऊ शकतो; मात्र जागतिक स्तरावर तो शोधप्रबंध इंग्रजी भाषेतच करावा लागेल. पुढील काळात जपान आणि भारत येथील शिक्षण व्यवस्थेत दुवा म्हणून काम करण्याचा प्रयत्न करेन, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांच्या पुस्तकांचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आदी.

# गांधीजींची मूल्ये अंगीकारण्याची गरज

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; निशा मुडे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

गांधीजींचा मार्ग अनुसरून दुटप्पी भूमिका न घेता अहिंसा, सत्य ही त्यांची मूल्ये अंगिकारली पाहिजेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागातर्फे महात्मा गांधी यांची १५० वी जयंती आणि विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांच्या पुस्तकांचे प्रकाशन झाले, त्या प्रसंगी ते बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, गांधीजींनी दिलेली मूल्ये अत्यंत महत्त्वाची आहेत. गांधीजी केवळ एक व्यक्ती नव्हते, तर कृतिशील सत्यविचार होते. त्यांच्या तत्त्वांपासून प्रेरणा घेऊन त्या विचारांचा अवलंब करण्याची आणि आपण गांधीरूप होण्याचे धाडस दाखवण्याची गरज आहे. डॉ. निशा मुडे-पवार यांच्या पुस्तकातून विचार आणि सृजनशीलतेचा मिलाफ दिसून येतो. 'वृत्तपत्रीय लेखनाची दोन दशके', 'सनीरेज' आणि 'संवादशास्त्र' या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

दुसऱ्या सत्रात महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळाच्या अधिष्ठाता आणि गांधी अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांचे 'महात्मा गांधीजी यांची पत्रकारिता आणि सद्यःस्थिती' या विषयावर व्याख्यान झाले.

डॉ. भारती पाटील यांनी दक्षिण अफ्रिकेत 'इंडियन ओपिनियन' ते 'हरिजन' या वृत्तपत्रांच्या प्रकाशन कालावधीतील गांधीजींच्या पत्रकारितेचा प्रवास कथित केला. गांधीजींवर संपादित १०० खंडांमध्ये गांधीजींनी संपादित केलेली ४ वृत्तपत्रे, पत्रे व इतर भाषणे या सामग्रीचा प्रामुख्याने समावेश केल्याचे सांगितले.

दशरथ पारेकर, प्रा. डॉ रवींद्र ठाकूर, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. रत्नाकर पंडित, अनुराधा इनामदार, सुधाकर बर्गे, शाहीर राजू राऊत, रिमा पाटील, मानसी पोवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सचिन दिवाण यांनी सूत्रसंचालन केले.

# शिवाजी विद्यापीठात आज स्वच्छता अभियान

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठात महात्मा गांधी जयंतीच्या निमित्ताने दरवर्षी स्वच्छता अभियान राबवले जाते. या वर्षीही विद्यापीठात स्वच्छता अभियान राबवले जाणार असून, बुधवारी सकाळी ७.३० ते १० या कालावधीत विद्यापीठातील सर्व अधिविभाग, प्रशासकीय विभागांमधील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी हे अभियान राबवणार आहेत.

# अक्षय मंगवडेची तुषार ठोंबरेवर मात

## शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय कुस्ती स्पर्धा

**कोगे / प्रतिनिधी :**

कुडित्रे (ता. करवीर) येथील कुंभी-कासारी सहकारी साखर कारखान्याच्या युवराज पाटील कुस्ती संकुलनात शिवाजी विद्यापीठाच्या आंतर विभागीय कुस्ती स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी पुरुषाच्या फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात रंगतदार लढती झाल्या. १२५ किलो गटात कोटोलीच्या अक्षय मंगवडे याने अधिक गुणाच्या आधारे कोल्हापूरच्या तुषार ठोंबरेवर विजय संपादित केला. अक्षय मंगवडे (प्रथम), तुषार ठोंबरे (द्वितीय), तर तृतीयस्थानी साहिल मुल्ला राहिला. स्पर्धाचे संयोजन गगनबावडा तालुक्यातील तिसंगी येथील म. ह. शिंदे महाविद्यालयाने केले आहे.

पुरुष विभागाच्या फ्री स्टाईलचा निकाल असा



स्पर्धेतील विजेते मल्ल.

: (गट, प्रथम, द्वितीय, तृतीय व महाविद्यालयाचे नाव) ५७ किलो- ओंकार लाड (महाविद्यालय, राधानगरी), संभाजी सावंत (बी. डी. सी. कॉलेज, पाटण), अभिषेक तडाखे (संपतराव माने कॉलेज, खानापूर). ६१ किलो- सागर सूळ (एल. बी. एस. कॉलेज, सातारा), ऋषिकेश घराळ ( एस. बी. खाडे, कॉलेज, कोपर्डे), कुलदीप पाटील (राधानगरी महाविद्यालय, राधानगरी), ६५ किलो -नीलेश हिरगुडे, (सदाशिवराव मंडलिक कॉलेज, मुरगूड), प्रकाश पाटील (विठ्ठलराव पाटील कॉलेज, कळे), विनायक वास्कर (सदाशिवराव मंडलिक कॉलेज, मुरगूड ), ७० किलो-प्रथमेश गुरव (बी. ये. बी. एन. कॉलेज चिखली), आकाश कापडे (सदाशिवराव मंडलिक कॉलेज, मुरगूड), प्रतीक म्हेतर (राधानगरी महाविद्यालय, राधानगरी), ७४ किलो -सुजित कानेरकर (यशवंतराव वारणा कॉलेज, वारणानगर), महेश गवळी (बापूजी साळुंखे कॉलेज, मिरज), बापूजी साळुंखे कॉलेज ▶▶ पान २ वर

# अक्षय मंगवडेची तुषार ठोंबरेवर मात

**(पान १ वरून)** कराड. ७९ किलो -अनिकेत चव्हान (एस. बी. एम. एम कॉलेज रहिमतपूर), केशव गावडे (शंकरराव जगताप कॉलेज वाघोली) भगतसिंग खोत (विठ्ठलराव पाटील कॉलेज कळे), ८६ किलो- अंकुर माने (विजयसिंह यादव कॉलेज वडगाव), सागर तमखडे (नागनाथ आण्णा नायकवडी कॉलेज झरे), अमोल कोंडेकर (विठ्ठलराव पाटील कॉलेज कळे), ९२ किलो - वैभव रायकर (विजयसिंह यादव कॉलेज वडगाव), ओंकार चौगले (राधानगरी महाविद्यालय राधानगरी), अजय शेंडगे (बाबा नाईक कॉलेज कोकरुड), ९७ किलो - प्रवीण सरक (मुधोजी कॉलेज फलटण), सुनील करावते (एन. डी. पाटील नाईट कॉलेज सांगली), इजाज मुजावर (कला वाणिज्य कॉलेज सातारा ), १२५ किलो - अक्षय मंगवडे (श्रीपतराव चौगले कॉलेज, कोटोली ), तुषार ठोंबरे (नाईट कॉलेज ऑफ आर्टस कोल्हापूर), साहिल मुल्ला (शहाजी कॉलेज कोल्हापूर).

# मध्यवर्ती युवा महोत्सवात विवेकानंदची बाजी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाचा ३९ वा मध्यवर्ती युवा महोत्सव मुधोजी कॉलेज, फलटण येथे पार पडला. या युवा महोत्सवामध्ये विवेकानंद कॉलेजने सांघिक व वैयक्तिक कलाप्रकारात घवघवीत यश प्राप्त करत संगीत व नृत्य सर्वसाधारण दोन फिरते चषक पटकाविले.

या युवा महोत्सवामध्ये नृत्य विभाग - जनरल चॅम्पियनशिप, संगीत विभाग - जनरल चॅम्पियनशिप, सांघिक स्पर्धेतील लघुनाटिका - प्रथम क्रमांक, भारतीय समूहगीत - प्रथम क्रमांक, पाश्चात्त्य समूहगीत स्पर्धा - द्वितीय क्रमांक, लोकनृत्य - द्वितीय क्रमांक, लोक वाद्यवृंद - द्वितीय क्रमांक, मूकनाट्य - तृतीय, पथनाट्य - उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त झाला आहे.

या व्यतिरिक्त वैयक्तिक स्पर्धांत रांगोळी - प्रथम क्रमांक, व्यंगचित्र - द्वितीय क्रमांक, सुगम गायन - द्वितीय क्रमांक, शास्त्रीय गायन - द्वितीय क्रमांक, शास्त्रीय नृत्य - द्वितीय क्रमांक, शास्त्रीय सूरवाद्य - द्वितीय क्रमांक, पाश्चिमात्य एकल गायन - तृतीय क्रमांक, कातरकाम - तृतीय क्रमांक, एकपात्री अभिनय - उत्तेजनार्थ इत्यादी कलाप्रकारात यश प्राप्त करत संगीत व नृत्य सर्वसाधारण दोन फिरते चषक पटकाविले आहेत. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पारितोषिके देऊन यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ३९ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात यश संपादन केलेला श्री विवेकानंद महाविद्यालयाचा संघ.

या यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व सांस्कृतिक विभागातील प्राध्यापकांचे अभिनंदन केले आहे. यावेळी प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, विद्यार्थ्यांनी अत्यंत कष्ट व जिद्दीतून युवा महोत्सवामध्ये आपल्या अंगीभूत असलेल्या कलागुणांचे सादरीकरण करून कडवी झुंज देऊन विवेकानंदच्या नावलौकिकास साजेसे यश प्राप्त केले व यशाची ही परंपरा कायम राखली. यामुळे संस्थेच्या नावलौकिकात भर पडली आहे.

संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी त्या म्हणाल्या, विवेकानंद कॉलेज नेहमीच शैक्षणिक गुणवत्ता, कला, क्रीडा अशा अनेक क्षेत्राबरोबरच सांस्कृतिक क्षेत्रात नेहमीच अग्रेसर राहिले आहे.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस. वाय. होनगेकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. ए. एस. महात, प्रा. बी. के. गोसावी, डॉ. मंजुश्री घोरपडे, प्रा. महेश हिरेमठ, प्रा. एच. व्ही. चामे, प्रा. डॉ. संजय अंकुशराव, प्रा. वर्षा पवार, प्रा. विकास मस्के प्रशासकीय कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांसाठी विशेष परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 OCT 2019
तरुण भारत

# मूल्याधिष्ठित जपानी शिक्षण व्यवस्था आदर्शवत

**नॅक समितीचे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील यांचे प्रतिपादन**

प्रतिनिधी
कोल्हापूर

मुल्याधिष्ठीत जपानी शिक्षण व्यवस्था जगासाठी आदर्शवत आहे. जपानी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबरोबरच नितीमुल्ये शिकवली जातात. त्याच वयात त्यांच्यामध्ये देशाभिमानाची भावना निर्माण केली जाते. जपानी आणि भारतीय शिक्षण संस्थांमध्ये संयुक्त विद्यमाने काही अभ्यासक्रम सुरू करणे गरजेचे असून मी त्यासाठी प्रयत्न करणार आहे. असे प्रतिपादन नॅक संस्थेचे सल्लागार डॉ.जगन्नाथ पाटील यांनी केले.

प्रेस क्लब येथे मंगळवारी डॉ. पाटील यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्यांची नियुक्ती जपानी शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी विशेषज्ञ म्हणून झाली. या पार्श्वभूमीवर ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठ आणि प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने हा संवाद झाला.

प्रेस क्लबचे अध्यक्ष मोहन मेस्त्री यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ.आलोक जत्राटकर यांनी डॉ.जगन्नाथ पाटील यांचा परिचय करून दिला. यावेळी पाटील म्हणाले, जपानी शिक्षण व्यवस्था ही आदर्शवत आहे. कारण त्यांचे शिक्षण मुल्याधिष्ठीत आहे. शाळेमध्ये विद्यार्थी स्वतः स्वयंपाक करून जेवतात. त्यामुळे त्यांच्यात एकात्मतेची भावना निर्माण होते. केवळ पदवीधर आणि रोजगारक्षम युवा पिढी बनवण्यावर त्यांचा भर नसून चांगला नागरिक घडवणे हा त्यांच्या शिक्षणव्यवस्थेचा उद्देश आहे. म्हणूनच सातत्याने भुकंपाचा धक्का सहन करणारा जपान जगातील ३ री सर्वात मजबूत अर्थव्यवस्था आहे.

मी शैक्षणिक विशेषज्ञ म्हणून एक वर्ष जपानमध्ये कार्यरत असणार आहे. या कालावधीत भारतीय शिक्षण संस्था आणि जपानी शिक्षण संस्थांच्या समन्वयाने काही अभ्यासक्रम सुरू करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. त्यामुळे आपल्या शिक्षण व्यवस्थेलाही दिशा मिळेल. यावेळी प्राचार्य संतोष चौगुले, सुनिल पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 OCT 2019

तरुण भारत

# राजा ढालेंचा प्रस्थापितांच्या विरोधात अखेरपर्यंत संघर्ष

**कोल्हापूर :** राजा ढाले यांचे सामाजिक व सांस्कृतिक योगदान हे त्यांनी आंबेडकरी चळवळीला दिलेल्या योगदानाइतकेच महत्त्वाचे आहे. या चळवळीला वैचारिक अधिष्ठान देण्याचे



काम त्यांनी आपल्या साहित्यातून केले. मंत्रीपद, खासदारकी अशा क्षणभंगूर आमिषाच्या मोहात न पडता सामाजिक न्यायासाठी प्रस्थापितांविरोधात अखेरपर्यंत त्यांनी संघर्ष केला, असे प्रतिपादन दलित पँथर चळवळीचे प्रवर्तक व ज्येष्ठ विचारवंत ज. वि. पवार यांनी केले.

**ज्येष्ठ विचारवंत ज. वि. पवार यांचे प्रतिपादन**

शिवाजी विद्यापीठातील सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या वतीने 'दलित चळवळ ते आंबेडकरी चळवळ: पँथर राजा ढाले यांचा परिप्रेक्ष्य" या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. हरिष भालेराव अध्यक्षस्थानी होते. केंद्राचे संचालक डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, रमेश शिपूरकर, प्रा. विनय कांबळे, नामदेवराव कांबळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 OCT 2019
तरुण भारत

# वनस्पतीशास्त्र प्रॅक्टीकल हॅण्डबुकचे प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या "भाग दोनच्या प्रॅक्टीकल हॅण्डबुक"चे प्रकाशन वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. व्ही. डी. जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तकाचे लेखन डॉ. ए.एन. सादळे, डॉ. एम.बी. वाघमारे, डॉ. निलेश पवार, डॉ. एम.एन. देसाई, डॉ. एस. एन. जाधव, डॉ. एम.एस. बन्सोडे यांनी केले आहे. यावेळी डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. बी. ए. कारदगे, प्रा. डॉ. पी. डी. चव्हाण, डॉ. जे. बी. दीक्षित, डॉ. एन. बी. गायकवाड, डॉ. के. बी. पवार, डॉ. एस. जी. घाणे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 OCT 2019
Times of India

# SRPD mock test in 164 colleges

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: The Shivaji University, Kolhapur (SUK) conducted a mock test of officials from 164 colleges associated with the Secured Remote Paper Delivery (SRPD) on Tuesday.

According to officials, the subjects under the SRPD have been expanded, which is why it is important that the staff members associated with the activity remain flawless with their knowledge pertaining to it.A circular regarding the same was issued to the college principals of the affiliated colleges earlier last month, G R Palase, acting director, Board of Examinations and Evaluation, SUK said.

He added that the mock distribution of the exam papers was conducted from 10.30 am onwards. The centres were asked to download a copy of the paper at 12 pm. All the colleges associated with the SRPD system were asked to actively participate in the test. In total, 216 colleges registered for the activity, of which 164 participated. "There will be another mock test for the rest of the colleges which did not participate in the activity," said Palase. The winter semester examination of the varsity is set to commence from October 15 across Sangli, Satara and Kolhapur districts later this month.